# समिती दर्पण

जुलै २०२५

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org

## समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्य सेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात सात आणि नगरमध्ये एक अशी आठ वसतिगृहे आहेत. त्यात १२०० हून अधिक विद्यार्थी -विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर समितीचे काम चालते.

# आव्हानात्मक प्रवेश प्रक्रिया

**ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील गुणवंत विद्यार्थ्यांना विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वसतिगृहात प्रवेश दिला जातो. त्यासाठी काही निकष निश्चित केलेले आहेत. त्या निकषांनुसार प्रवेश देण्याची प्रक्रिया राबविणे, हे आव्हानात्मक काम आहे. यात समितीच्या कार्यकर्त्यांचा कस लागतो. या प्रवेश प्रक्रियेदरम्यानचे अनुभव...**





**रत्नाकर मते, विश्वस्त**

सन २०२५- २६ या शैक्षणिक वर्षाकरिता विद्यार्थी साहाय्यक समितीच्या पुण्यातील सात व महिला सेवा मंडळाच्या सहकार्याने गरवारे महाविद्यालयाजवळ सुरू झालेल्या एक अशा आठ वसतिगृहातील एकूण १२१० जागांवरील प्रवेश हे एक आव्हान आहे. त्यापैकी ७३६ जुन्या विद्यार्थ्यांचे प्रवेश कार्यकारी विश्वस्तांच्या प्रेरणेतून साकारलेल्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत, वसतिगृहनिहाय एकत्रितरित्या जून महिन्यात पालकांच्या उपस्थितीत समितीच्या उपक्रमांविषयी विद्यार्थी व पालक यांचे प्रबोधन करून करण्यात आले. या नवीन संकल्पनेत सर्वच संबंधित कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

दहावी/ बारावी परीक्षांचे निकाल, महाविद्यालयांचे विस्कळीत वेळापत्रक, महाविद्यालये सुरू होण्याच्या तारखांमधील अनिश्चितता, व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाचे अनिश्चित वेळापत्रक या कारणांमुळे जवळजवळ ४७५ विद्यार्थ्यांचे नवीन प्रवेश हे अधिक आव्हानात्मक झाले आहेत. या पार्श्वभूमीवर साधकबाधक चर्चा, सांगोपांग विचारानंतर या प्रवेश प्रक्रियेचे वसतिगृहनिहाय रिक्त जागा, या जागांची फॅकल्टीनुसार विभागणी, आलेल्या अर्जांची छाननी, मुलाखती, निवड यासाठी लागणारा कालावधी लक्षात घेऊन २०२५- २६ च्या प्रक्रियेचे नियोजन करण्यात आले. प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया ता. ६ जून २०२५ रोजी सुरू करण्यात आली. प्रत्यक्ष मुलाखती अधिक परिणामकारक होऊन सुयोग्य, गरजू, होतकरू विद्यार्थ्यांना प्रवेश दिले जावेत म्हणून मुलाखती घेणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण सत्र घेण्यात आले.

आजवर या प्रक्रियेद्वारे आलेल्या ९५० अर्जांची छाननी करून ६०० विद्यार्थ्यांच्या १५/ १६ फेऱ्यांद्वारे मुलाखती घेऊन ३२५ प्रवेश निश्चित केले आहेत. याकरिता वीसहून अधिक कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवून सुमारे ४०० मनुष्य तासांचे योगदान दिले.

या मुलाखतीदरम्यान, विद्यार्थ्यांनी अर्जात दिलेली माहिती, कार्यकर्त्यांनी नोंदविलेली माहिती, निरीक्षणे यांचे एकत्रित संकलन व अवलोकनावरून असे आढळून येते की,

१) विभागवार तुलनेत अधिक विद्यार्थी पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा विभागातून आले आहेत. सर्वच विभागातील विद्यार्थिनींची संख्या लक्षणीय आहे.

२) यावर्षी शिक्षणात १ - २ वर्षांचा खंड असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय होती. बिकट आर्थिक परिस्थिती, त्याबरोबरच 'नीट'सारख्या प्रवेश परीक्षा हेही कारण प्रामुख्याने दिसून येते. काही विद्यार्थ्यांनी कौटुंबिक समस्या हे कारण दिले.

३) आर्थिक निकषावर उत्पन्नाचे दाखले व प्रत्यक्ष मुलाखतीदरम्यान दिलेली माहिती याचा मेळ बसत नसला, तरी बहुसंख्य कुटुंबांचे उत्पन्न वार्षिक दोन लाख रुपयांपेक्षा अधिक नाही. बहुतांश शेतकरी पालक अल्पभूधारक आहेत.

४) बऱ्याच विद्यार्थ्यांनी प्रथितयश स्वायत्त महाविद्यालयात नॉनएडेड कोर्सेसना प्रवेश घेतलेला आहे. त्यामुळे महाविद्यालयाची वार्षिक फी चाळीस हजारांपासून ९० हजार रुपयांपर्यंत आहे.

५) वाणिज्य शाखा, डिप्लोमा, अभियांत्रिकी शाखांचे चांगले शिक्षण तसेच सनदी लेखापाल, राज्य लोकसेवा आयोग, केंद्रीय लोकसेवा आयोग यांच्या स्पर्धा परीक्षांसाठी उपलब्ध सुविधा व पोषक वातावरण, भविष्य घडविण्यासाठी मिळू शकणाऱ्या संधी या कारणांमुळे पुणे शहराकडे विद्यार्थ्यांचा ओढा आहे. प्रसंगी पालक यासाठी आर्थिक झळ सोसण्याची तयारी दाखवत आहेत. या झळांची धग काही प्रमाणात कमी करण्यासाठी पालकांना समितीची वसतिगृहे हा उत्तम पर्याय वाटतो.

६) पुणे शहराच्या परिघावर असणाऱ्या गावांमधील विद्यार्थीही आता पुण्यातील महाविद्यालयांच्या वेळा, वाहतुकीची अपुरी साधने, गर्दीच्या वेळची मंदावलेली वाहतूक या कारणांनी दररोज जाण्यायेण्याचा वेळ व खर्च टाळून शहरात वसतिगृहात वास्तव्य करण्यास प्राधान्य देताना दिसतात.

७) समितीच्या वसतिगृहात होणारे संस्कार, सर्वांगीण विकास व सुरक्षित वातावरण हे विशेषतः विद्यार्थिनींच्या बहुतांश पालकांना महत्त्वाचे वाटतात.

# महिला सेवा मंडळाच्या सहकार्याने विद्यार्थिनींसाठी नवे वसतिगृह

## लीला पूनावाला यांच्या हस्ते उद्घाटन, ८० मुलींची सोय



महिला सेवा मंडळ आणि विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वतीने उभारलेल्या मुलींच्या वसतिगृहाचे उद्‌घाटन प्रसिद्ध उद्योजिका आणि सामाजिक कार्यकर्त्या लीला पूनावाला यांच्या हस्ते झाले. एरंडवणे येथील महिला सेवा मंडळाच्या प्रांगणात असलेल्या या वसतिगृहात नव्याने ८० मुलींची व्यवस्था होणार आहे. उद्‌घाटन सोहळ्याला मराठवाडा मित्र मंडळ संस्थेचे कार्याध्यक्ष व समितीचे कायम विश्वस्त भाऊसाहेब जाधव, तुकाराम गायकवाड, महिला सेवा मंडळाच्या पुष्पा हेगडे, प्रतिभा घोरपडे, राखी शेट्टी, तनुजा पुसाळकर, समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, खजिनदार संजय अमृते, यांच्यासह दोन्ही संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. प्रकल्प समन्वयक प्रभाकर पाटील यांनी हा वसतिगृह प्रकल्प साकारण्याचा प्रवास उलगडला. समितीच्या कार्यकर्त्या सुप्रिया केळवकर यांनी सूत्रसंचालन केले. ॲड. प्रतिभा घोरपडे यांनी आभार मानले. या वसतिगृहाच्या पालक कार्यकर्त्या म्हणून सुप्रिया केवळकर काम पाहणार आहेत.

“ ग्रामीण भागातून पुण्यात शिकण्यासाठी येणाऱ्या मुलींची निवास- भोजनाची सोय करतानाच त्यांचा व्यक्तिमत्व विकास करून सक्षम बनविण्याचे कार्य कौतुकास्पद आहे. नवीन वसतिगृह अनेकींचे आयुष्य घडवेल.
**पद्मश्री लीला पूनावाला,** प्रसिद्ध उद्योजिका, सामाजिक कार्यकर्त्या

“ समितीची वसतिगृहे परिवर्तनाची केंद्रे आहेत. ग्रामीण भागातील मुलांना घडवणारे हे मॉडेल पुण्यासह बाहेरही विस्तारण्यासाठी प्रयत्नशील आहोत. दोन चांगल्या संस्था एकत्रित येऊन चांगले काम होतेय, याचा आनंद आहे.
- **तुषार रंजनकर,** कार्यकारी विश्वस्त, विद्यार्थी साहाय्यक समिती

“ महिला सेवा मंडळ गेली अनेक वर्षे मुलींच्या शिक्षणासाठी, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहे. समितीच्या साथीने या कार्याला आणखी चांगल्या पद्धतीने पुढे घेऊन जाता येईल.
- **पुष्पा हेगडे,** महिला सेवा मंडळ



## माधुरी रिसबुड निवृत्त

सन २००९ मध्ये विद्यार्थी साहाय्यक समितीमध्ये ग्रंथपाल म्हणून रुजू झालेल्या माधुरी रिसबुड १९ जुलैला निवृत्त झाल्या. १९ जुलैला समितीतर्फे त्यांचा निरोप समारंभही झाला.

माधुरीताईंना सुरुवातीला ग्रंथालयाच्या कामाचा अनुभव नव्हता, पण काम शिकण्याची मनापासून इच्छा होती. त्यांनी तिन्ही वसतिगृहांतील ग्रंथालयांचे काम सांभाळले. अगदी रजिस्टरमधील नोंदींपासून कॉम्पुटराईझ्ड एंट्रीज असा त्याचा प्रवास कौतुकास्पदच होता.

गेली दोन वर्षं त्या स्वागत कक्षात समन्वयक म्हणूनही काम पाहात होत्या. सर्वांशी हसतमुखाने बोलणे ,मदत करणे हे त्यांचे विशेष गुण. समितीचा निरोप घेताना त्यांनी ग्रंथालयासाठी देणग्याही मिळवून दिल्या. त्यांना पुढील प्रवासा साठी समितीतर्फे शुभेच्छा !!

# आयुष्य बदलणारी साडेपाचची योगासने

## तयाचा वेलू...



*वैद्य हरिश्चंद्र (हरीश) पाटणकर*

सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यातील आसू हे वैद्य हरिश्चंद्र ऊर्फ हरीश पाटणकर यांचे गाव. त्यांचे वडील प्रगतिशील शेतकरी. नावावर बऱ्यापैकी जमीन. पण शेतीमध्ये हातात नियमित पैसे येत नाहीत आणि खर्च तर नियमित असतात. ते करता यावे म्हणून दुग्धव्यवसाय, भाजी विक्री, ग्राहक संघाप्रमाणे घाऊक सामान घेऊन मेंबर्समध्ये वाटप असे विविध व्यवसाय त्यांच्या वडिलांनी केले आणि मुलांनी त्यांना त्यात मदत केली. हरीश सांगतात, “शेतात उगवलेली भाजी विकायला आम्ही आठवडे बाजारात जायचो. डोक्यावर ओझं घेऊन जायचं, दिवसभर विक्री करायची. ती होईलच ह्याची खात्री नाही. एक जुडी विकली तर एक रुपया मिळायचा. कधी कधी काहीच विकलं गेलं नाही तर तेच ओझं वाहत परत गावी... एकेक रुपया कमावणं किती कष्टाचं असतं, हे आम्ही खूप लवकर शिकलो..”

हरीश यांचे चौथीपर्यंतचे शिक्षण गावातील जिल्हा परिषद शाळेत झाले. नंतर सातवीपर्यंत फलटणला होते. पण शिक्षणासाठी दुसऱ्या गावी राहण्याचा खर्च झेपेना म्हणून सातवीनंतरचे शिक्षण गावीच झाले.

हरीश अभ्यासात हुशार... स्कॉलरशिप, दहावी, बारावीत



केंद्रात पहिला नंबर. त्यांचा सरकारी कॉलेजमधला एमबीबीएसचा प्रवेश थोडक्यात हुकला. खासगी कॉलेजमध्ये प्रवेश घेण्याची शक्यता नव्हती, पण आरोग्य क्षेत्रात करिअर करायचे, हे नक्की होते. म्हणून त्यांनी आयुर्वेद शाखेची निवड करून पुण्यात अष्टांग आयुर्वेद महाविद्यालयात प्रवेश घेतला.

पुण्यात पहिल्या वर्षी पेईंग गस्ट म्हणून शेअर बेसिसवर राहता आलं. पण पुढच्या वर्षी निसर्गाच्या अवकृपेने आर्थिक परिस्थिती बिघडली. त्यावेळी त्यांच्या एका मित्राने समितीचे नाव सुचविले. पण समितीच्या दृष्टीने ते अगदीच negative candidate होते. घरची जमीन होती, कमी उत्पन्नाचा दाखला नव्हता, त्यांचे academic record उत्कृष्ट होते, एक वर्ष पुण्यात आपले आपण राहू शकले होते. “Rejected due to High qualifications” ...असा त्यांच्या अर्जावरचा शेरा होता.

हरीश यांनी आपले सगळे कौशल्य पणाला लावले. “आमची ह्यावर्षी परिस्थिती बिकट आहे, मला एक वर्ष राहू द्या. पुढच्या वर्षी शक्य असेल तर मी आपणहून होस्टेल सोडेन!!! दुसऱ्या गरजू मुलाची सीट अडवणार नाही,” हे त्यांनी प्रवेश समितीला पटवून दिले.

लजपत होस्टेलमध्ये प्रवेश मिळाला तो एका मुख्य गुणावर, तो म्हणजे हरीश यांना योगासने उत्कृष्ट येत होती. योग विद्या धाम, नाशिकचा सर्टिफिकेट कोर्स झालेला होता आणि आयुर्वेद शिक्षणात योग हा महत्त्वाचा भाग होताच. साडेपाचची योगासने घेईन, हे सांगितल्यावर प्रवेश निश्चित झाला खरा, पण कॉलेज होस्टेलपासून लांब. तसेच एका क्लिनिकमध्ये असिस्टंटशिप, समितीमधील कामे आणि कमवा शिका... कष्ट आणि धावपळीचे दिवस सुरू झाले. होस्टेलमधील जेवणाचा डबा मित्र भरून ठेवायचे आणि हरीश तो रात्री साडेअकरा- बाराला रूमवर आल्यावर जेवायचे. जिवाला जीव देणारे मित्र समितीत मिळाले, तसेच चांगले गुणही अंगी बाणवायला मदत केली. स्वच्छता, स्वावलंबन, शिस्त ही समितीची त्रिसूत्री. विविध गटचर्चांच्या सरावामुळे त्यांना वादविवाद, वक्तृत्व ह्यात खूप फायदा झाला, बक्षिसे सुद्धा मिळाली.

प्रतापराव पवार यांचा उल्लेख करताना ते म्हणाले, एका भाषणात त्यांनी सांगितलं, India is a developing country. Think of an idea and develop it. It will help our country and help you grow too. ते शब्द मी माझ्या हृदयावर कोरून ठेवले आणि त्याप्रमाणे कायम चालत राहिलो.

पुण्यातील एका नामांकित वैद्यांकडे ते शिकायला, अनुभव घ्यायला जात. त्या गुरूंनी त्यांना रोगनिदान, रुग्णोपचाराचे धडे तर दिलेच, पण आयुष्यातील महत्त्वाचे निर्णय घ्यायला वेळोवेळी मदत केली. हरीश यांची एकूण धावपळ आणि त्याचा तब्येतीवर झालेला परिणाम बघून त्यांनी हरीश यांच्या वडीलांना शैक्षणिक कर्ज घेण्याची कल्पना सुचविली. तेथे हरीश यांची समिती सुटली. मात्र समितीची शिकवण कायम सोबत राहिली.

बीएएमएस झाल्यावर सन २००८ मध्ये त्यांनी स्वतःच्या प्रॅक्टिसला सुरुवात केली. दरम्यान लग्न झाले. पत्नीही आयुर्वेद तज्ज्ञ. नेत्र चिकित्सक. या प्रवासात हरीश यांनी, द्रव्यगुण विज्ञान, कायायुर्वेद, केशायुर्वेद अशी पुस्तके लिहिली. बीव्हीजीचे हणमंतराव गायकवाड यांनी त्यांच्यातील गुण हेरले आणि त्यांना कंपनी चालू करण्यासाठी उद्युक्त केले, आर्थिक सहकार्यही केले. त्यातून केशायुर्वेद ही कंपनी उभी राहिली. भारतातील पहिले आयुर्वेदिक skin and hair testing lab and research center त्यांनी उभे केले. पाच वर्षांत जगभरात १०८ सेंटर उभी करण्याचे स्वप्न, त्यांनी तीन वर्षांतच पूर्ण केले. ह्या विशेष कार्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी ह्यांच्या हस्ते Best Ayush Start up award ने त्यांना गौरवण्यात आले.

तसेच आतापर्यंत त्यांनी साडेसात हजार नेत्र तर्पण विधी पूर्ण केले आहेत, ज्याद्वारे डोळ्याचे आरोग्य सुधारायला मदत होते. विशेष म्हणजे पुणे पोलिसांसाठी त्यांनी चालवलेल्या ह्या अभियानातून एकही पोलिस सुटलेला नाही. आयुर्वेदाच्या विद्यार्थ्यांना मदत व्हावी म्हणून त्यांनी “प्राचीन संहिता गुरुकुल” ह्या नावाने ट्रेनिंग इन्स्टिट्यूट सुरू केली आहे. ज्यात रोग निदान, औषध निर्माण, योग तसेच तज्ज्ञ वैद्य आणि इतरांची व्याख्याने अशा विविध गोष्टींचा लाभ मुलांना आणि इच्छुक व्यक्तींना घेता येतो. देशविदेशात आयुर्वेदाच्या प्रसारासाठी, उपचारांसाठी त्यांनी अनेक व्याख्याने दिलेली आहेत.

हरीश पाटणकर समितीमध्ये एक वर्षच राहिले असले तरी संपर्क कधीच सुटला नाही. समितीसाठी देणग्या गोळा करण्याच्या उद्देशाने झालेले नाटकाचे प्रयोग, नीलेश साबळे यांचा शो, तांबोळी सरांवर केलेला चित्रपट, समितीचा माहितीपट अशा वेगवेगळ्या गोष्टीत त्यांचा सहभाग राहिलेला आहे.

**(शब्दांकन- माधवी कुलकर्णी)**

## मनोगत

**अवधूत अत्रे, माजी विद्यार्थी**

# समितीने दिली समाजाचे प्रश्न सोडविण्याची ताकद

सन २०१८ मध्ये जेव्हा मी पहिल्यांदा विद्यार्थी साहाय्यक समितीच्या दारातून आत गेलो, तेव्हा माझ्या डोळ्यांत मोठी स्वप्ने होती, पण ती पूर्ण करण्याकरीता साधने मात्र मर्यादित होती. पुण्यातील माझ्या पदवी शिक्षणाच्या काळात समितीने मला फक्त अन्न आणि निवारा दिला नाही, तर मला एक समुदाय, एक दिशा आणि जगण्यासाठीची मूल्ये दिली.

सध्या मी अझीम प्रेमजी विद्यापीठात विकास या विषयात पदव्युत्तर शिक्षण घेत आहे. अलीकडेच मी सुरतमधील पर्यावरण सुरक्षा समितीमध्ये इंटर्नशिप पूर्ण केली आहे. या कामाचा एक भाग म्हणून, या समितीने सादर केलेल्या Invited Disaster : Khadi Floods in Surat City या अहवालाचा सहलेखक होण्याची संधी मिळाली. ज्यामध्ये बेसुमार बांधकामे, कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठीची अपुरी यंत्रणा यामुळे सुरतमधील पाण्याचे नैसर्गिक प्रवाह बंद होऊन शहर पुराचे केंद्र कसे बनले, याविषयी निरीक्षणे नोंदविली गेली. यातील निष्कर्षांची नोंद स्थानिक नागरिकांसह राष्ट्रीय माध्यमांकडूनही घेतली गेली.

मला मिळालेली ही संधी आणि त्यात मिळविलेले यश यामागे जे बळ आहे ते विद्यार्थी साहाय्यक समितीकडून मला मिळालेले आहे. समितीमध्ये शिकलेल्या मूल्यांनी केवळ माझ्या शैक्षणिक मार्गालाच आकार दिला नाही, तर जनहितासाठी काम करण्याची प्रेरणाही दिली. समितीत प्रतिकूल परिस्थितीशी झगडणारे मित्र मिळाले. त्यातून मला स्वतःच्या पलीकडे विचार करायला आणि जबाबदारीने वागायला शिकविले. सुरतमध्ये सर्वेक्षण करताना किंवा आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांबरोबर अहवालाच्या शिफारशींवर चर्चा करताना, मी अनेकदा समितीमधील शिस्त, मार्गदर्शन आणि वेळोवेळी मिळालेले प्रोत्साहन याचा विचार करीत असे. विचारांमधील स्पष्टता आणि आत्मविश्वास यांचा जो पाया समितीत रचला गेला, त्यातून मला या कामात योगदान देता आले. म्हणूनच समितीतील वातावरण, संस्कार यांना मी अभिवादन करतो. समितीच्या विद्यार्थ्यांना मी असे सांगेन की, तुमचे समितीतील वास्तव्य महत्त्वाचे आहे. समितीतील संस्कार, मूल्ये आणि अनुभव तुम्हाला समाजाचे प्रश्न सोडविण्याची, त्याकरता उपाय निश्चित करण्याची आणि महत्त्वाचे म्हणजे, दुर्बल, वंचितांचा आवाज होण्याची क्षमता देईल. विद्यार्थी साहाय्यक समिती हा माझा पाया आहे, माझे कुटुंब आहे. समितीमुळेच माझ्या जीवनात अर्थपूर्ण बदल शक्य झाले, असे मला वाटते.



*सॉफ्ट कार्नर कंपनीचे भागीदार अरुण कडेकोडी, रवींद्र दामले आणि सौ. मीनल कडेकोडी यांनी समितीच्या विद्यार्थिनींसाठी बारा नवीन सायकली देणगी स्वरुपात दिल्या.*

## अनुभव

**ऋतुजा दत्तात्रय गावडे,**
**मधुभाऊ चौधरी वसतिगृह, अहिल्यानगर.**

# हा सुखसोहळा स्वर्गी नाही...!

**हेची व्हावी माझी आस | जन्मोजन्मी तुझा दास ||**
**पंढरीचा वारकरी | वारी चुको न दे हरी ||**

हाच भाव मनात ठेवून वारकरी वर्षानुवर्षे वारीची वाट चालतात. वारीचा अनुभव घ्यायला गेलेले मी... कधी माझं मन अभंगांमध्ये, टाळांच्या, मृदंगांच्या गजरात रमायला लागलं कळलंच नाही. दोन वर्षांच्या अनुभवात वारीच्या वाटेवर असंख्य लोक भेटले. तेही वेगवेगळ्या जाती- जमातीचे. पण त्यांच्यात कधीही वाद होत नाहीत, याचं नेहमीच नवल वाटतं. इकडं शहरात वावरताना थोडी गर्दी झाली तरी आपल्याला त्रास व्हायला लागतो. पण इथं तर लाखो वारकरी सोबत चालत असतात. ओळख नसतानाही एकमेकांची आपुलकीने विचारपूस करतात. स्वतःच्या जवळ जे काही आहे, त्यातलं घासभर शेजाऱ्याला देण्याची भावना इथं दिसून येते. वारी माणसाला आयुष्याचं नियोजन करायला शिकविते.

वारी म्हणजे फक्त २० दिवस आणि २५० किमीचा प्रवास नाही, तर वर्षभर आनंदानं जगण्याचं साधन आहे. दिवसभर




चालणारे अभंग, दुपारी- रात्री सर्वांसोबत पंगतीत बसून केलेलं जेवण, चालताना केलेली मजा- मस्ती, रस्त्यात खेळलेल्या फुगड्या, संध्याकाळी म्हटलेला हरिपाठ, ठिकठिकाणची रिंगणं, बोरगावमध्ये एकत्र आलेला पालख्यांचा सोहळा, आषाढी एकादशीच्या दिवशी रात्री १२ वाजता चंद्रभागेत केलेली अंघोळ, कळसाचं दर्शन, द्वादशीला उपवास सोडून परत निघताना डोळ्यांत आलेलं पाणी... अजूनही जसंच्या तसं आठवतं आणि मनात येतं

हा सुखसोहळा स्वर्गी नाही...!

## मैत्री पुस्तकांशी

**सुशील मेघना राजेंद्रकुमार पुरी**

# प्रा. सुभाषचंद्र भोसले यांच्यातील सृजनशीलतेचे दर्शन




**पुस्तकाचे नाव- सृजनयज्ञ**
**लेखिका- डॉ. नीता मोहिते**

'जया अंगी मोठेपण तया यातना कठीण' या उक्तीप्रमाणे प्रा. सुभाषचंद्र भोसले यांनी आपले जीवन व्यतीत केले. विद्यार्थी साहाय्यक समितीचे विद्यार्थी ते पुणे विद्यापीठाचे कुलसचिव हा त्यांचा संघर्षमय प्रवास मनाला भारावून टाकणारा आहे. स्नेहवर्धन प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या पुस्तकात डॉ. नीता मोहिते यांनी प्रा. सुभाषचंद्र भोसले यांचा जीवनपट उलगडला आहे.

भोसले सरांनी त्यांच्या आयुष्यात वेगवेगळ्या क्षेत्रात जे कार्य केले, ते अनेकांसाठी दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरले. भूगर्भशास्त्र विषयात पदव्युत्तर शिक्षण घेऊन काही दिवस त्यांनी फर्ग्युसन महाविद्यालयात अध्यापन केले. त्यानंतर ते प्रशासकीय सेवेत उपजिल्हाधिकारीपदी नियुक्त झाले. प्रशासनात त्यांनी अनेक पदे भूषविली. वकील असलेल्या वडिलांकडून त्यांना प्रामाणिकपणा व कष्टाळूपणा अशी मूल्ये मिळाली. आईकडून आध्यात्मिक बाळकडू मिळाले. आपल्या संपूर्ण कारकिर्दीत त्यांनी 'कर्म हीच पूजा' हे सूत्र काटेकोरपणे पाळले. सरांचा संघर्षमय जीवनपट लेखिकेने ओघवत्या शैलीत व मार्मिक भाषेत शब्दबद्ध केलेला आहे.

असे म्हणतात की, यज्ञ म्हणजे परब्रह्मप्राप्तीसाठी केलेल्या साधनेचा विशिष्ट पद्धतीने होणारा विधी. यज्ञपूर्णतेसाठी पवित्र वस्तूंची आहुती दिली जाते. त्याग हा यज्ञप्राप्तीचा मूलमंत्र असतो. सृजनशीलतेचा ध्यास निरंतर मनी बाळगून आपल्या कार्याची आहुती अखंडपणे अर्पण करीत हा सृजनयज्ञ ज्यांनी साकारला ते प्रा.सुभाषचंद्र भोसले. त्यांच्या अनुभवांची शिदोरी वाचकांना समृद्ध अनुभव देऊन जाते. आयुष्यात आलेल्या अनेक अडचणींवर मात करीत आपल्या अभूतपूर्व कार्याचा ठसा उमटवणारे एक सृजन म्हणूनच प्रा. सुभाषचंद्र भोसले यांचे दर्शन या पुस्तकातून होते.